# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला
## कृषि तंत्र विद्यालय, बुलढाणा

**प्राचार्य**
डॉ. सतिशचंद्र मा. जाधव
एम.एस.सी., पीएच.डी. (मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र)

दुरध्वनि क. (कार्या.) ९८५०३७३७६४
ईमेल : atsbuldana@gmail.com


जा.क्र./कृतंवि/२२० /२०२६-२७ कृषि तंत्र विद्यालय, बुलढाणा दिनांक : ३ / ६ /२०२६

## दर पत्रक पुरविने बाबत सुचनापत्र

**विषय : सन २०२६-२०२७ करिता भाडे तत्वावरील खाजगी ट्रॅक्टरने/ बैलजोडीने कार्यालयाचे प्रक्षेत्रावरील मशागतीचे, मळणीचे व भांडार विभागाचे दैनंदीन विविध काम करण्याकरीता दर मागविणे बाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की,कृषि तंत्र विद्यालय, बुलढाणा याकार्यालयाचे प्रक्षेत्रावर सन २०२६-२०२७ या वर्षात ट्रॅक्टरने/ बैलजोडीने शेतीचे दैनंदीन मशागतीचे/मळणीचे/भांडार विभागाचे विविध कामे करण्याकरिता इच्छुक ट्रॅक्टर धारक, बैलजोडी धारक व काम करणारकडून खालील नमुद केल्या प्रमाणे दर मागविण्यात येत आहेत.

**अ) खरिप, रब्वी व उन्हाळी हंगाम सन २०२६-२०२७ करिता प्रक्षेत्रावरील दैनंदीन विविध काम खाजगी तत्वावर भाडयाच्या ट्रॅक्टरने करण्याकरीता मागविलेल्या दराचे विवरण खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | कामाचे विवरण | प्रकार | दर प्रती हेक्टरी रूपये/प्रति कीलो मिटर व प्रती क्विंटल प्रमाणे | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | नांगरटी | २ फाळी पलटी | | |
| २ | नांगरटी | ३ फाळी पलटी | | |
| ३ | पंजीवाही | ५ फाळी | | |
| ४ | ति-वाही | ३ फाळी | | |
| ५ | फंटावाही | ९ फाळी | | |
| ६ | पासावाही | ३ पासा | | |
| ७ | पटटीपास जांभूळ वाही | एकपास | | |
| ८ | रोटाव्हेटर | ५ फुट | | |
| ९ | पेरणी पटटीपाससह | ट्रॅक्टरचलित पेरणी यंत्राने | | |
| १० | पेरणी विनापटटीपास | ट्रॅक्टरचलित पेरणी यंत्राने | | |
| ११ | फवारणी | ट्रॅक्टरचलित बुम स्प्रेपंप | | |
| १२ | फवारणी | पॉवर स्प्रे/पाठीवरील हस्त चलित | | |
| १३ | डवरणी | ट्रॅक्टर व दोन ओळीतील अंतर | | |
| | अ. डवरणी | ४५ सें.मी. | | |

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय, बुलढाणा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ब. डवरणी | ६० सें.मी. | | |
| | क. डवरणी | ९० सें.मी. | | |
| | ड. डवरणी | १२० सें.मी. | | |
| १४ | पिकांची मळणी | ट्रॅक्टर व डीझेल इंजीनचलित थ्रेशरने मळणी दर प्रती क्विंटल रूपये. | | |
| | सोयाबीन | | | |
| | ज्वारी | | | |
| | मका | | | |
| | तूर | | | |
| | मुंग | | | |
| | उडीद | | | |
| | हरभरा | | | |
| | गहु | | | |
| | जवस | | | |
| १५ | भुस/बियाणे/खते वाहतूक | दर हे प्रति कीलो मिटर, प्रति ट्रीप प्रमाणे नमूद करावे | | |
| | भूस व बियाणे वाहतूक लोकल ट्रीप (कृषि तंत्र विद्यालयाचे प्रक्षेत्र ते डेयरी विभागाचे चारा साठवण कक्ष व भांडार विभाग पर्यंत) | | | |
| | भुस/बियाणे/खते वाहतूक (कृषि तंत्र विद्यालयाचे प्रक्षेत्रा व्यतिरिक्त लांब पल्ल्याची ट्रीप मालवाहू गाडीने | | | |
| १६ | बियाणे पोते/कटटे उचलणे (लोडींग व अनलोडींग) हमाली सेवा शुल्क | दर हे प्रति क्विंटल लोडींग व अनलोडींग प्रमाणे नमूद करावे | | |
| १७ | कडबा कुटी पिक: मका, ज्वारी व ईतर. | | | |

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय, बुलडाणा

c|7

**ब) खरिप, रब्बी व उन्हाळी हंगाम सन २०२६-२०२७ करिता प्रक्षेत्रावरील दैनंदीन विविध काम खाजगी तत्वावर भाडयाच्या बैलजोडीने करण्याकरीता मागविलेल्या दराचे विवरण खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | कामाचे विवरण | प्रकार | दर प्रती हेक्टरी रूपये |
|---|---|---|---|
| १ | बैलचलित यंत्राने सोयाबीन, ज्वारी, मका, तीळ, मुंग, उड्डीद, गहु, हरभरा व जवस इ. पिकांची पेरणी करणे. | ४५, ६० व ९० सें.मी. अंतर (बैलजोडी,चालक व सर्व साहीत्यासह) | |
| २ | हस्तचलित टोकन यंत्राने सोयाबीन, ज्वारी, मका, तीळ, मुंग, उडीद, गहु, हरभरा व जवस इ. पिकांची पेरणी करणे. | ४५, ६० व ९० सें.मी. अंतर (टोकन यंत्र ,चालक व सर्व यंत्रणासह) | |
| ३ | बैलचलित यंत्राने कापूस व तूर इ. पिकांची पेरणी करणे | ४५, ६० व ९० सें.मी. अंतर | |
| ४ | बैलचलित यंत्राने काकर व चौफूली पाडणे | अ)४५x४५सें.मी.१.५ फूट अंतर चौफूली<br>ब)६०x४५सें.मी अंतर चौफूली | |
| ५ | बैलचलित डवरणी (आंतर मशागत) | अ)४५ सें.मी. डवरणी<br>ब)६० सें.मी डवरणी<br>क)९० सें.मी डवरणी व ईतर. | |
| ६ | बैलचलित वखर (आंतर मशागत) | ४५, ६० व ९० सें.मी. अंतर | |

भाडे तत्वावर ट्रॅक्टर व बैलजोडीच्या साहाय्याने करावयाच्या कामाबाबत सविस्तर अटी व शर्ती खालील नमूद केलेले आहे. दरपत्रक सादर करतेवेळी लिफाफ्यावर ट्रॅक्टर,बैलजोडी व कामकरणार यांचे नांव, पत्ता व संपर्क क्रमांक ई.चा स्पष्ट उल्लेख असावा. तरी इच्छुक ट्रॅक्टर, बैलजोडी धारक व काम करणार यांनी उपरोक्त दर तक्त्याच्या प्रमाणे दरपत्रक या कार्यालयाला दिनांक: १२.६.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत लिफाफाबंद स्वरूपात स्पष्ट सुटसुटीत अक्षरात सादर करावेत. आवश्यक सर्व अटी पूर्ण करणा-या ट्रॅक्टर, बैलजोडी व ईतर काम करणार यांचाच काम करून घेण्यास विचार करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय
**बुलढाणा**

**प्रतिलिपी:** सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, सागवन ता.जि.बुलढाणा यांना विनंती की, सदर निविदा आपले कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व्यापक प्रसिध्दी करिता लावण्यात यावी.

**<u>अटी व शर्ती:</u>**

१. प्रक्षेत्रावर काम करतांना काम समाधानकारक झाल्याची खात्री करूनच देयक अदा करण्यात येईल.

२. ट्रॅक्टर व वापरत असलेले अवजारे सुस्थितीत असने अत्यावश्यक आहे.

३. ट्रॅक्टरने करावयाचे सर्व कामे हे कार्यालयीन वेळेतच सकाळी ९.४५ ते संध्याकाळी ५.४५ या वेळेत करावी लागतील.

४.कार्यालयाचे ज्या प्रक्षेत्रावर काम उपलब्ध असेल त्याच प्रक्षेत्रावर काम करावे लागेल.

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय, बुलढाणा

५ . प्रक्षेत्रनिहाय नेमून दीलेले काम वेळेत पूर्ण करावे लागेल . काम अर्धवट सोडून दील्यास सदरचे कामाचे देयक अदा करण्यातयेणार नाही .

६ . ट्रॅक्टर / बैलजोडीने / भांडार विभागात / बियाणे प्रक्रिया केंद्र येथे काम करीत असतांना कोणत्याही प्रकारचे नुकसान, जिवीत हानी अथवाअपघात झाल्यासकार्यालय, विद्यापीठ अथवा संबधित अधिकारी किंवा कर्मचारी जबाबदार राहणार नाही . त्याचीसर्वस्वीजबाबदारी ट्रॅक्टर, बैलजोडी मालकाचीव काम करणार यांची राहील .

७ . ट्रॅक्टरने काम करीत असतांना प्रक्षेत्रावर विद्यापीठाच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची कटाक्षानेकाळजी घ्यावी . नुकसान झाल्यास ट्रॅक्टर / बैलजोडी मालकास जबाबदार धरण्यात येवून नुकसान भरपाई करण्यात येईल .

८ . दरपत्रक सादर करतांना दरांचा सर्व कर व सेवा शुल्कसहीत स्पष्ट उल्लेख करावा . नमुद केलेल्या दरा व्यतीरीक्त इंधन, दुरूस्ती व ट्रॅक्टरचलीत साहीत्य व तुट फूट सुधार करण्यास कोणतेही शुल्क अदा केल्या जाणारनाही . खोडतोड असलेले दरपत्रक स्विकारल्याजाणार नाही व तशे दरपत्रक रदद करण्यात येईल .

९ . प्रक्षेत्रावर नेमून दीलेले काम समाधानकारक व पर्ण झाल्यावर देयकाची संपूर्ण प्रक्रिया झाल्यावरच देयक खर्च अदाकरण्यात येईल . ट्रॅक्टरचालक हा विहीत परवानाधारकच असावा .

१० . प्रक्षेत्रावर कामझाल्यावर सदरचे केलेल्या कामांचेदेयक दोन प्रतीत विनाविलंब सादर करावे . देयकासोबत आपले बॅक खाते क्रमांक पूर्ण माहीतीसहसादरकरावे .

११ . आपण पूरवित असलेले सर्व कामांचे दर हे आर्थिक वर्ष २०२५-२०२६ दरम्यान वैध राहतील . मध्यंतरीच्या कालावधित कोणत्याही प्रकारची माहागाई व दरांमध्ये ईतर कोणतेही बदल झाल्यास सादर केलेल्या दरांमध्ये बदल करता येणार नाही .

१२ . आपण करीत असलेले काम हे पूर्णता: अस्थाई स्वरूपाचे असेल या बाबत कोणताही स्थाई स्वरूपाचा दावा करता येणार नाही .

उपरोक्त प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असणा-या ट्रॅक्टर, बैलजोडी मालक व कामकरणार धारकांनीच दरपत्रक सादर करावेत .

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय
बुलढाणा